# अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा

**डीटीएड परीक्षा - जून २०१६ अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याचा कार्यक्रम**

## अध्यापक विद्यालयाचे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य यांनी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना

*महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद*

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे ४११ ००१

फोन:(०२०)२६१२३०६६, २६१२३०६७ फॅक्स:(२०)२६१२९९१९

email - mscepune@gmail.com

website - www.mscepune.in

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील डी.टी.एड परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नाव | हुद्दा | दूरध्वनी | |
|---|---|---|---|---|
| | | | कार्यालय | मोबाईल |
| १. | श्री. महावीर माने | अध्यक्ष | २६१२३०६६/६७ | ९४२३८५९९६६ |
| २. | श्री. रा. वि. गोधने | आयुक्त | २६१२३०६६/६७ | ९०११९३९६८१ |
| ३. | श्री. बी. डी. फडतरे | उपायुक्त | २६१२३०६६/६७ | ९६२३११७२८७ |
| ४. | श्रीम. एस. बी. गौड | सहा. आयुक्त | २६१२३०६६/६७ | ८८०६४८६७२८ |
| ५. | श्री. एन. बी. निकम | मूल्यमापन अधिकारी | २६१२३०६६/६७ | ९४२२४०४२६३ |
| ६. | श्री. बी. आर. रोकडे | मूल्यमापन अधिकारी | २६१२३०६६/६७ | ७७०९४३०९३३ |
| ७. | श्री. डी. एच. पोळ | लेखाधिकारी | २६१२३०६६/६७ | ७३८७७७७०३७ |

* टीप * - सदरचे दूरध्वनी क्रमांक फक्त तातडीच्या कार्यालयीन संपर्कासाठी आहेत. ते विद्यार्थी / पालकांना देऊ नयेत. कारण विद्यार्थ्यांची कोणतीही वैयक्तिक माहिती परिषदस्तरावर उपलब्ध नसते. ती कॉलेज स्तरावर उपलब्ध असते.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | जून - २०१६ च्या परीक्षेबाबत अधिसूचना<br>• आवेदनपत्र भरण्याबाबत प्राचार्यांना सूचना<br>• परीक्षेचा कालावधी<br>• परीक्षार्थीच्या पात्रतेचे निकष<br>• आवेदनपत्र भरताना घ्यावयाची दक्षता<br>• परीक्षा शुल्क<br>• आवेदनपत्रे सादर करण्याचे वेळापत्रक | १ ते १३ |
| २ | डी.टी.एड्. परीक्षा जून - २०१६ च्या कामाचे संभाव्य वेळापत्रक | १४ |
| ३ | डी.टी.एड्. परीक्षा जून - २०१६ चे वेळापत्रक | १५-१६ |
| ४ | अध्यापक विद्यालय, मंजूर तुकड्या/मंजूर विद्यार्थी संख्येबाबतची माहिती **प्रपत्र-ह** | १७ |
| ५ | परीक्षार्थीची यादी (इयरकोड निहाय) **प्रपत्र-य** | १८ |
| ६ | परीक्षा शुल्क भरणा माहिती **प्रपत्र-व** | १९ |
| ७ | परीक्षार्थ्याचे माध्यम व विषयनिहाय माहिती **प्रपत्र-न** (Indent-1) | २० |
| ८ | आवेदन पत्राच्या गठ्ठयावर लावावयाचे मुखपृष्ठ **कंट्रोल शीट** | २१ |
| ९ | जमा शुल्काचा तपशील **प्रपत्र - अ** | २२ |
| १० | ऑनलाईन भरलेल्या आवेदन पत्रातील त्रुटींची माहिती **प्रपत्र - ब** | २३ |
| ११ | पडताळासूची | २४ |
| १२ | गुणपडताळणी अर्जात अचूक माहिती देणेबाबतचे पत्र | २५-२६ |
| १३ | गुणपडताळणी अर्जाचा नमुना | २७ |
| १४ | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळणेबाबत अटी/शर्ती व सूचना | २८ |
| १५ | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मिळणेबाबतच्या अर्जाचा नमुना | २९ |
| १६ | लेखनिक पुरविण्याबाबत शासन निर्णय दि.१८ मार्च २०१४ | ३०-३४ |

**<u>अत्यंत महत्वाचे पत्र</u>**

जा.क्र.मरापप/डीएड-प्रशा/परीक्षाजून-१६
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-१.
दिनांक: ०२/०२/२०१६

प्रति,

प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण सर्व
प्राचार्य अध्यापक विद्यालय सर्व

**विषय:- आवेदन पत्र भरताना आढळणाऱ्या सर्व साधारण त्रुटींबाबत..**

डी.टी.एड.परीक्षा नोव्हें-२०१५ च्या आवेदन पत्राची छाननी केली असता सर्वसाधारण खालील त्रुटी आढळून आल्या.

१) आवेदन पत्रात भरलेल्या विषयकोडच्या विषयांपेक्षा नवीनच विषयकोडच्या परीक्षेला प्रविष्ट होणे.

२) मागील परीक्षेत अनुत्तीर्ण असणाऱ्या सर्व विषयांचे विषयकोड आवेदन पत्रात न भरणे.

३) मागील परीक्षेत उत्तीर्ण असलेल्या विषयाचा विषयकोड आवेदन पत्रात भरणे व त्या विषयाच्या परीक्षेला बसणे.

४) मागील परीक्षेत उत्तीर्ण असलेल्या विषयाचा विषयकोड आवेदन पत्रात भरणे व त्या विषयाच्या परीक्षेला न बसणे.

५) आवेदन पत्र भरताना प्रात्यक्षिक परीक्षेचा विषयकोड आवेदन पत्रात भरुन प्रत्यक्षात त्या विषयाच्या लेखी परीक्षेला प्रविष्ट होणे.

६) डीबार परीक्षार्थीचे आवेदन पत्रासोबत डीबारचे गुणपत्रक व त्यापूर्वीच्या परीक्षेचे गुणपत्रक न जोडणे.

७) डीएड-५० मध्ये प्रात्यक्षिक गुण भरताना प्राप्त गुणांपेक्षा कमी गुण भरणे, प्रात्यक्षिक गुणांची जागा रिकामी ठेवणे किंवा विहीत गुणांपेक्षा जादा गुण देणे, विद्यार्थ्यांचे चुकीचे नाव दुरुस्त न करणे आणि डीएड-५० मध्ये चुकीच्या नोंदी वेळेत दुरुस्त करुन न देणे.

वरील त्रुटींमुळे निकाल जाहिर करण्यास खुपच विलंब होतो.त्यामुळे डीटीएड परीक्षा जुन-२०१६ चे आवेदन पत्र भरताना वरील चुका होणार नाहीत, याची दक्षता अध्यापक विद्यालय स्तरावर घेण्यात यावी.

प्राचार्य जिल्हा व प्रशिक्षण संस्था यांनी अध्यापक विद्यालयांची आवेदन पत्रे प्रती स्वाक्षरी करण्यापूर्वी वरील चुका आवेदनपत्र किंवा डीएड-५० मध्ये राहिलेल्या नाहीत याची शहानिशा करुनच प्रती स्वाक्षरी करावी.

(रा.वि.गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

# डी.टी.एड्.परीक्षा जून-२०१६ च्या परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याबाबतच्या सूचना

१) आवेदनपत्राचा संगणकीय नमुना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) अध्यापक विद्यालय हे मा. संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०. यांनी Online प्रसिद्ध केलेल्या २०१५-२०१६ मध्ये मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालयांपैकी असले पाहीजे. संबंधित पानाची प्रिंट/झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने/वर्मा कमिटीने शिफारस केल्याने/विद्यार्थ्याअभावी संस्थेने स्वत: बंद केलेल्या अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे ज्या अध्यापक विद्यालयात समावेशन करण्यास मान्यता मिळाली आहे त्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे मान्यता पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

४) या परीक्षेची आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. परीक्षार्थीचा फोटो व सोबत उमेदवाराची स्वाक्षरी स्कॅन करावयाची आहे. छापील प्रत (Hard Copy) काढून परीक्षार्थी व प्राचार्यानी स्वाक्षरी करुन माहिती प्रमाणित करावयाची आहे.

५) ज्या विषयाच्या परीक्षेस विद्यार्थी प्रविष्ट होणार आहे. त्या विषयावर ऑनलाईन क्लिक करुन विषय निवडावा.

६) आवेदनपत्रासोबत रंगीत फोटो स्कॅन करावयाचा आहे. विद्यार्थी व प्राचार्य यांनी भरलेल्या माहितीची खात्री करुन "OK" वर क्लिक करुन छापील प्रत (Hard Copy) काढून घ्यावी व त्यावर प्राचार्य व परीक्षार्थींनी स्वाक्षरी करावयाची आहे. अध्यापक विद्यालयाची आवेदनपत्रे डाएट प्राचार्यांनी प्रतिस्वाक्षरी करावयाची नाहीत, परंतु अध्यापक विद्यालयाची विद्यार्थी क्षमता व इतर आवश्यक बाबी तपासून अध्यापक विद्यालयांनी संगणकीय आवेदनपत्रे सादर करणाऱ्या पत्रावर (प्रपत्र-ह वर) डायट प्राचार्यांनी प्रतिस्वाक्षरी करावयाची आहे.

७) संगणकीय आवेदनपत्रे भरताना कोणतीही चूक होणार नाही याची वेळीच दक्षता घ्यावी. तसेच आवेदनपत्रातील सर्व तपशील काळजीपूर्वक खात्रीशीर तपासणी करुन अचूक व परिपूर्ण आवेदनपत्रे परिषदेस सादर करावीत. एकाच विद्यार्थ्याची दोन अथवा अधिक आवेदनपत्रे सादर करु नयेत.

८) आवेदन पत्र भरताना झालेल्या चूकीची सर्वस्वी जबाबदारी संबधीत विद्यार्थी व प्राचार्य यांची राहील.

९) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी व्यवस्थापन कोट्यास मान्यता दिलेल्या पत्राची प्रत जोडावी.

## संगणकीय आवेदनपत्रे परिषदेस सादर करताना खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ) संस्था नोंदणी व विद्यार्थी नोंदणी शुल्क भरलेबाबत चलनाची किंवा डी.डी. ची मूळ प्रत.

ब ) प्राचार्य पद मंजूर नसल्यास प्रभारी प्राचार्याच्या मान्यतेची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत.

### संगणकीय आवेदनपत्रे खालील क्रमाने सादर करावयाची आहेत -

१) संगणकीय आवेदनपत्रासोबत फक्त गुणपत्रकाची प्रत

२) एन फॉर्म सोबत परीक्षा फी भरलेल्या चलनाच्या दोन प्रती.

३) अध्यापक विद्यालयाने डाएट प्राचार्यांच्या प्रतिस्वाक्षरीच्या पत्रासोबत ह,य व न इत्यादी प्रपत्रे जोडावित.

४) प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये अचूक माहिती भरुन स्वतंत्रपत्रे आवेदनपत्रासोबत देणे.

५) संगणकीय आवेदनपत्रे इयरकोडनिहाय सादर करावीत. इयरकोडचा तपशिल काळजीपूर्वक वाचावा.

६) १९९३ च्या अभ्यासक्रमाची आवेदपत्रे स्वतंत्ररित्या द्यावयाची आहेत.

**७) प्रा.Diet यांनी सदरचे अध्यापक विद्यालय सन २०१५-१६ साली सुरु आहे, नियमित प्राचार्याची नियुक्ती व मान्यता आहे / प्राचार्य पदाचा प्रभारी पदभार देणेस विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यता दिली आहे आणि स्पॉट / व्यवस्थापन कोटा प्रवेशांचा मान्यता आदेश तपासूनच अध्यापक विद्यालयाच्या आवेदन पत्रावर प्रति स्वाक्षरी करावी.**

८) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०, यांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या २०१५-२०१६ साठी मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालयातूनच Online आवेदनपत्रे भरता येतील.

# परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरुन सादर करण्याबाबतची नियमावली

## परीक्षा कालावधी - दि. ०२/०६/२०१६ ते ११/०६/२०१६ या कालावधीत परीक्षा घेण्यात येणार आहे.

**अध्यापक शिक्षण पदविका परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी परीक्षार्थी म्हणून पात्रतेचे निकष -**

- परीक्षार्थीचा प्रवेश शासकीय कोट्यातील असल्यास राज्यशासनाने नियुक्त केलेल्या **"राज्य डी.टी.एड्. प्रवेश समितीने"** मान्य केलेला असावा.
- प्रवेश स्पॉट / व्यवस्थापन कोट्यातील असल्यास, प्रवेशास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली असावी.
- प्रवेश पत्रद्धारा प्रशिक्षण योजनेतून असल्यास त्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांची मान्यता असणे आवश्यक आहे. संबंधित प्रवेश घेतलेल्या प्रवेशपत्राची झेरॉक्स प्रत आवेदनपत्रासोबत असावी.
- परीक्षार्थीची ८०% उपस्थिती पूर्ण होणे आवश्यक आहे.
- ८०% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या परीक्षार्थीची अनुपस्थिती क्षमापित प्रकरणे दि. १५/०४/२०१६ पूर्वी प्राचार्य Diet यांनी निकाली काढावीत.
- परीक्षार्थीचे अंतर्गत गुण ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. (**अध्यापक विद्यालयाने अंतर्गत गुण व वार्षिक पाठाचे गुण विहीत नमुन्यात (डी.टी.एड्.५०) कळविणे आवश्यक आहे.**)
- अध्यापक विद्यालयाने वार्षिक पाठाचे नियोजन वेळेत करावे. त्याबाबत परीक्षा परिषदेने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. डी.टी.एड्.५० मध्ये वार्षिक पाठाचे गुण नोंदविणे आवश्यक आहे. डी.टी.एड्.५० एकदा कार्यालयास सादर केल्यानंतर पुन्हा गुणांच्या नोंदी स्विकारण्यात येणार नाहीत.
- प्राचार्य मान्यता नसल्याने किंवा प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची स्वाक्षरी नसल्याने विहीत **कालमर्यादेनंतर डी. टी. एड्. ५० सादर करणाऱ्या अध्यापक विद्यालयांना रू. १०००/- दंड शुल्कासह डी. टी. एड्. ५० सादर करावे लागतील,** अन्यथा त्या अध्यापक विद्यालयाचा निकाल राखीव ठेवला जाईल व अध्यापक विद्यालयावर प्रशासकीय कारवाईची शिफारस करण्यात येईल.
- परिषद कार्यकारी समिती सभा क्र.४ दि.३०/१२/२०१४ मधील ठराव क्र. १०० अन्वये डी. टी. एड्. ५० मध्ये प्रात्यक्षिक गुणामध्ये तफावत असल्यास संबंधित अध्यापक विद्यालयास दंड आकारण्यात येईल. तसेच मा. संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे मार्फत संबंधित अध्यापक विद्यालयास याबाबत सक्त ताकीद देण्यात येईल.
- **परिषद कार्यकारी समिती सभा क्र.४ दि.३०/१२/२०१४ मधील ठराव क्र. १०० अन्वये विहीत गुणापेक्षा जादा गुण दिल्यास प्रती विद्यार्थी रू. २०००/-, विहीत गुणाऐवजी गुणांची जागा रिकामी ठेवल्यास प्रती विद्यार्थी रू. १०००/- आणि विद्यार्थ्याने प्राप्त केलेल्या गुणांपेक्षा कमी गुण नोंद केल्यास प्रतीविद्यार्थी रू. ५०००/- दंड भरावा लागेल. विहीत दंडाच्या रकमेचा भरणा केल्याची पावती व मूळ अभिलेख तपासून गुणांची दुरुस्ती करण्यात येईल. अन्यथा सदर परीक्षार्थिचा निकाल राखीव ठेवला जाईल.**

## - संगणकीय आवेदनपत्रे भरण्यापूर्वी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता -

अ) परीक्षार्थीस लागू असणारा इयर कोड अचूकपणे दर्शविणे आवश्यक आहे कारण इयरकोडप्रमाणे परीक्षेस प्रविष्ट होण्याच्या दृष्टीने विषयाची माहिती संगणक पडद्यावर उपलब्ध होणार आहे.

| **इयरकोडबाबतची माहिती खालीलप्रमाणे** | **इयर कोड क्रमांक** |
|---|---|
| **प्रथम वर्ष नियमित विद्यार्थी (First year fresh)** | १ |
| **प्रथम वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (First year repeater only)** | २ |
| **द्वितीय वर्ष उत्तीर्ण असून फक्त प्रथम वर्षाच्या काही विषयास बसणारे विद्यार्थी (Second Year Pass & First year repeater only)** | ३ |
| **प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेस एकाच वेळी बसणारा विद्यार्थी (Appearing for first & second year)** | ४ |
| **द्वितीय वर्ष नियमित विद्यार्थी (Second year fresh)** | ५ |
| **द्वितीय वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (Second year repater only)** | ६ |

ब) **ज्या नवीन अध्यापक विद्यालयांनी अद्याप परीक्षा परिषदेची संलग्नता (अध्यापक विद्यालय सांकेतांक) घेतलेली नाही, त्यांची आवेदनपत्रे प्राचार्यांनी संगणक प्रणालीद्वारे पाठवू नयेत.**

क) **सर्वसाधारण सूचना :-**

१) संगणकीय आवेदनपत्रे भरताना प्रथमत: पूर्णपणे माहिती पुस्तिका व सूचना संपूर्ण वाचूनच माहिती भरावी.

२) द्वितीय वर्षाचे आवेदनपत्रे भरताना यापूर्वीचा नजिकच्या परीक्षेचा बैठक क्रमांक बिनचूक लिहावा. तो चुकीचा लिहील्यास अन्य विद्यार्थ्याचे गुण गुणपत्रिकेवर छापले जातात. त्याची जबाबदारी संबंधितांवर राहील. मागील गुणपत्रकावरून प्राचार्यानी मागील बैठक क्रमांकाची पडताळणी करावी.

३) या कार्यालयाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच उमेदवारास परीक्षा द्यावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदलता येणार नाही.

४) यापूर्वी डी.टी.एड्. परीक्षेस बसलेल्या आणि गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांची प्रतिबंधित मुदत संपली असल्याची खात्री केल्यानंतरच परीक्षा परिषदेकडे सादर करण्यात यावीत. गैरमार्गाचा अवलंब केलेल्या उमेदवारावर लादलेल्या शास्तीची मुदत संपण्यापूर्वी त्यांचे आवेदनपत्र परीक्षा परिषदेकडे आपणाकडून सादर झाल्यास **त्यास संबंधित प्राचार्य हे व्यक्तीश: जबाबदार राहतील व त्यामुळे उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणाचा खर्च त्यांना भरावा लागेल. सदर आवेदनपत्रासोबत शास्ती लावलेल्या पत्राची साक्षांकित प्रत जोडावी.**

५) संगणकीय आवेदनपत्रातील सर्व सांकेतांक इयर कोड, नावाचे स्पेलिंग, परीक्षेस सूट पाहीजे असलेल्या विषयाची नोंद, ज्या विषयात बसावयाचे आहे त्याविषयाच्या संपूर्ण संपादणुकीची **"तपशीलवार नोंद करणे ही उमेदवारांची"** आणि **"त्या नोंदी तपासणे ही संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्याची"** व्यक्तिगत जबाबदारी आहे. प्राचार्य या बाबीकडे पाहत नाहीत असे आढळून आले आहे. यापुढे नोंदीत त्रुटी राहिल्यास त्यास उमेदवार आणि संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य हे संयुक्तरित्या व्यक्तिश: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. चुकीच्या नोंदीमुळे होणाऱ्या नुकसानीस परिषद जबाबदार राहणार नाही.

६) **आवेदनपत्रावरील प्रतिस्वाक्षरीबाबत :** प्रथम व द्वितीय वर्षाच्या (Repeater) पुनर्प्रवेशू विद्यार्थ्यांच्या यादीवर तसेच आवेदनपत्रावर अधिकृतता तपासणीच्या दृष्टीने संबंधित जिल्ह्यातील **"प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था / शिक्षण निरीक्षक, (उत्तर) बृहन्मुबई"** यांची प्रतिस्वाक्षरीची आवश्यकता नाही. तथापी प्राचार्य, डायट यांनी जिल्ह्यातील प्रत्येक अध्यापक विद्यालयाची मंजूर क्षमतेची पडताळणी करुनच संगणकीय आवेदनपत्रे सादर करणाऱ्या अध्यापक विद्यालयांच्या पत्रावर फक्त प्रतिस्वाक्षरी करावी.

७) अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षेची संगणकीय आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोबतच्या वेळापत्रकाप्रमाणेच सादर करावीत.

**महत्वाचे :-** पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेच्या आवेदनपत्रावर **"उपसंचालक पत्रद्वारा प्रशिक्षण योजना एस.सी.ई.आर.टी. पुणे."** यांची प्रतिस्वाक्षरी घेऊन संबंधित अध्यापक विद्यालयांनी विहीत वेळेत संगणकीय आवेदनपत्रे सादर करावीत. विहीत वेळेत संगणकीय आवेदनपत्रे सादर न करणाऱ्या अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांना शासन निर्णयानुसार विलंब शुल्क भरावे लागेल. याची कृपया नोंद घ्यावी. (शासन निर्णय क्र.एस.सी.एच.२००५/(२३६/०५) साशि-१, दि. ०३ एप्रिल २००६)

**संगणकीय आवेदनपत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे :** प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याच्या (नियमित) आवेदनपत्रासोबत संबंधित विद्यार्थ्यांची इ.१२ वी ची परीक्षा उत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिकांच्या साक्षांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. प्रथम व द्वितीय वर्षाच्या पुनर्प्रवेशू व नियमित विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रासोबत **"पूर्वीच्या सर्व डी.टी.एड्. परीक्षांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित सत्यप्रती"** जोडणे आवश्यक आहे.

**अंतर्गत मूल्यमापनाचे गुणाबाबत -**

**अ)** सर्व नियमित उमेदवारांचे तसेच पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेअंतर्गत नियमित परीक्षार्थ्याचे अंतर्गत मूल्यमापनांचे गुण व वार्षिक पाठाचे गुण विहीत नमुन्यात (डी.टी.एड्.५०) न चुकता परिषदेने निर्धारित केलेल्या कालावधीत परीक्षा परिषदेकडे सादर करावेत. विहीत कालावधीत याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास व संबंधित उमेदवार प्रात्यक्षिक गुणाअभावी अनुत्तीर्ण घोषीत झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**अंतर्गत गुण नोंदविताना प्राचार्यांनी स्वतः खात्री करून घ्यावी. अंतर्गत मूल्यमापनाच्या गुणाबाबतच्या नोंदीमधील चुका दंडात्मक कारवाईस पात्र राहतील, याची प्राचार्यानी नोंद घ्यावी.**

**ब)** डी.टी.एड्. ५० मध्ये अंतर्गत गुण देताना कमाल मर्यादेपेक्षा जास्त गुण दिलेले नाहीत, याची पूर्णपणे खात्री करावी. अन्यथा या चुका करणा-या शिक्षक व प्राचार्य या दोघांनाही जबाबदार धरण्यात येईल व काही चूक झाल्यास दंडात्मक /प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. किमान गुणांपेक्षा कमी गुण नोंदविलेले असल्यास अशा गुणांमधे दुरूस्ती करण्यात येणार नाही.

## डी.टी.एड्. ५० अहवाल भरताना खालीलप्रमाणे सूचनांचे दक्षतापूर्वक पालन करावे.

I. परीक्षार्थीच्या पूर्व संपादणूकीचा हा अहवाल प्राचार्यांनी काळजीपूर्वक पडताळणी करून प्रत दुरुस्त्यांसह अथवा काहीही दुरुस्ती नसल्यास बिनचूक असल्याचे प्रमाणपत्रासह परिषदेने निर्धारित केलेल्या दिनांकापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे संबंधित प्रमाणपत्रासह सुपूर्द करुन SCERT यांच्या दि. १३/०७/२००७ च्या पत्रानुसार गुणांची खात्री करून घ्यावी.

II. प्रत्येक परीक्षार्थीचे नाव अध्यापक विद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील नोंदीप्रमाणे आहे याची खात्री करावी.

III. नियमित परीक्षार्थीची आवश्यक ती उपस्थिती नसल्यास अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही. आवश्यकतेपेक्षा कमी उपस्थिती सक्षम अधिकाऱ्याने डी.टी.एड्.५० परिषदेस सादर करण्यापूर्वी क्षमापित केल्यास त्यास परीक्षेस बसता येईल.

नियमानुसार आवश्यक उपस्थिती कमी असणाऱ्या विद्यार्थ्याची कमी असलेली उपस्थिती क्षमापित केल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे आदेश असल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यास परीक्षा प्रवेशपत्र देऊ नये. आवश्यक उपस्थिती नसल्यास त्या विद्यार्थ्यांच्या नावावर लाल शाईने रेषा मारून शेरा रकान्यात **"No Candidate" असा शेरा लिहावा.** तेथे अधिकृत प्राचार्यांनी स्वतंत्र सही करावी.

IV. कोणत्याही परीक्षार्थ्यास ऐनवेळी माध्यम बदलून देता येणार नाही. आवेदनपत्राप्रमाणे त्याचे माध्यम असेल.

V. **कोणत्याही परीक्षार्थ्यास एकदा निश्चित करून दिलेले परीक्षा केंद्र बदलता येणार नाही. डी.टी.एड्.५० अहवालामध्ये ज्या विषय क्रमांकाखाली * * अशी खूण असेल त्या विषयास उमेदवार परीक्षेस बसला आहे असे समजावे. विषय क्रमांकाखाली विषयास पुनर्प्रवेशू परीक्षार्थींच्या नावापुढे नोंदविलेले पूर्व संपादणूक गुण अध्यापक विद्यालयाच्या अभिलेखावरून सत्य असल्याची पडताळणी करावी.**

VI. प्रथम वर्षाचे व द्वितीय वर्षाचे अंतर्गत गुण स्वतंत्रपणे डी.टी.एड्.५० मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नियमित, पूनर्प्रवेशू अशा सर्व परीक्षार्थ्यांची अतर्गत गुणांची (प्रथम व द्वितीय वर्षाची) स्वतंत्र नोंद करण्यात यावी.

VII. डी.टी.एड्.५० अहवालात खाडाखोड अथवा चुकीची माहिती दिल्यास काही विद्यार्थ्यास जाणीवपूर्वक कमी, **अथवा कमाल गुणापेक्षा जास्त गुण दिल्यास संबंधित प्राचार्य व्यक्तीशः जबाबदार राहतील.** अशा कृतीबद्दल म.ना.से.नियम १९७९ (शिस्त व अपिल) / M.E.P.S. Rule १९८१ नुसार संबंधित विषय शिक्षक, लिपीक व प्राचार्य यांचेवर कारवाई करण्याच्या सूचना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

VIII. डी.टी.एड्.५० अहवालाव्यतिरिक्त अन्य मार्गाने गुण स्विकारले जाणार नाहीत. त्यामुळे डी. टी. एड्. ५० अहवालात गुणांची नोंद करण्यापूर्वी त्याची पूर्ण खात्री करूनच डी. टी. एड्. ५० अहवालात गुण दर्शवावेत. कारण ***प्रात्यक्षिक परीक्षेचे व वार्षिक पाठाचे गुण एकदा डी. टी. एड्. ५० अहवालामध्ये लिहून परिषदेस दिल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल होणार नाही.***

IX. यापूर्वीच्या परीक्षांतील पूर्व संपादणूक (गुण) डी. टी. एड्. ५० अहवालात नमूद केलेली आहे. त्यामध्ये बदल करु नये. तसा बदल निदर्शनास आल्यास ही बाब गंभीर समजून संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यावर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. बदल पुराव्यानीशी सादर केल्यास तो मान्य करण्यात येईल.

X. अहवालामध्ये ज्या नोंदीच्या ठिकाणी दुरुस्ती केलेली आहे. (नावात, गुणात, अंतर्गत गुणात) त्या नोंदीभोवती लाल शाईने वर्तुळ करुन त्याच्यावर बदल नोंदवावा CHNG. MADE या कॉलममध्ये एकूण दुरुस्त्यांची संख्या नोंदवावी. डी. टी. एड्. ५० अहवालाच्या शेवटी "Total No. of Corrections" अंकी व अक्षरी नोंदवाव्यात. नियमित विद्यार्थ्यांची उपस्थित दिवसांची माहिती तसेच अंतर्गत गुणांची माहिती न चुकता डी. टी. एड्. ५० अहवालात देण्यात यावी. तसेच नोव्हे-२०१५ परीक्षेतील गुणांच्या फेरपडताळणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांच्या काही विषयातील गुणांमध्ये बदल झालेला आहे, असा बदल झालेल्या गुणांची नोंद संबंधित परीक्षेच्या **डी. टी. एड्. ५० मध्ये लाल शाईने करण्यात यावी.** तसेच एखादा विद्यार्थी यापूर्वीच्या परीक्षेमध्ये गुणांच्या फेरपडताळणीमध्ये बदल होऊन सर्व विषयात उत्तीर्ण होत असेल तर त्यासंबंधित विषयाचे बदल झालेले गुण डी.टी.एड्.५० मध्ये लाल शाईने नोंदवून त्या विद्यार्थ्यांच्या नावापुढे **Passed in verification** असा शेरा लिहावा व पुढे "Will not appear for this examination" असे लिहावे.

XI. **डी. टी. एड्. ५० अहवालात कोणताही रकाना रिकामा ठेवू नये.**

XII. जे विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षा व प्रात्यक्षिक कार्य या परीक्षेत अनुत्तीर्ण झाले आहेत, फक्त अशा विद्यार्थ्यांच्या सदरच्या परीक्षा परत घेण्यात याव्यात. जे विद्यार्थी या परीक्षेत यापूर्वीच उत्तीर्ण झाले असतील तर त्यांची **पुन्हा परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही**.

XIII. वरीलप्रमाणे **डी.टी.एड्.५०अहवालातील नोंदीत दुरूस्त्या नोंदविल्यावर अहवालाच्या प्रत्येक पानावर अध्यापक विद्यालयाचा शिक्का उमटवून व त्यावर प्राचार्यांनी स्वाक्षरी करावी.** त्यानंतर आपल्या जिल्ह्याच्या डायट प्राचार्यांची (मुंबईसाठी शिक्षण निरीक्षक, उत्तर) यांची प्रतिस्वाक्षरी (Counter Sign) घ्यावी.

**प्रतिस्वाक्षरी झालेले डी. टी. एड्. ५० अहवाल क्रमाने लावून DIET अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत परिषदेने निर्धारीत केलेल्या दिवशी समक्ष परीक्षा परिषदेत सादर करावेत.**

८) संगणकीय आवदेनपत्रे परिषदेने स्विकारल्यानंतर आणि त्याची संपूर्ण छाननी झाल्यानंतरच विद्यार्थी सर्व नियम व अटीच्या संदर्भात पात्र आहे की अपात्र हे ठरविण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस आहे. तसेच **"परीक्षा दिल्यानंतरही संबंधितांच्या पात्रतेबाबत त्रुटी आढळल्यास संबंधितांची संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस राहील"** याची संबंधितांनी नोंद घ्यावी. ही बाब सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

९) **परीक्षेचे वेळापत्रक उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याबाबत :** अध्यापक शिक्षण पदविका जून-२०१६ च्या परीक्षेसाठी निश्चित केलेले परीक्षांचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे. सदर परीक्षांचे वेळापत्रक उमेदवारांच्या निदर्शनास आणावे. सोबतची सर्व प्रपत्रे ह, व, य आणि न पडताळासूची सोबत सादर करावीत.

१०) **पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेंतर्गत उमेदवारांची आवेदनपत्रे :** उपसंचालक पत्रद्वारा प्रशिक्षण योजना पुणे यांनी आवेदनपत्रावर प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी खालील बाबीची गांभीर्यपूर्वक खात्री करावी.

**अ) पत्रद्वारा प्रवेश** : उमेदवाराचा प्रवेश नियमानुसार असून पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेच्या मान्य यादीतील आहे व त्याचे प्रवेशाचे माध्यम बरोबर आहे. नियमित उमेदवारांचे प्रवेशास सक्षम अधिकाऱ्याची मान्यतास असावी.

**ब) परीक्षा पूर्वअटीची पूर्तता** : उमेदवाराने परीक्षेसाठी आवश्यक उपस्थिती व अंतर्गत काम पूर्ण केल्याची खात्री केली आहे. (नियमानुसार संपर्क सत्रे पूर्ण झाली आहेत.)

**क) प्रतिबंधित कालावधी** : गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिलेल्या उमेदवाराचा प्रतिबंधीत कालावधी पूर्ण झाल्याची खात्री केली आहे.

उपरोक्त अ,ब,क बाबीची खात्री केल्याशिवाय पत्रद्वारा उमेदवाराच्या आवेदनपत्रावर उपसंचालक पत्रद्वारा यांनी प्रतिस्वाक्षरी करु नये.

११) **अपंगत्वाच्या सवलतीबाबत -** ज्या परीक्षार्थिना अपंगत्व असल्याची सवलत घ्यावयाची आहे. त्यांनी आवेदनपत्रातील २.६ जात संवर्ग या रकान्यासमोरील रिक्त जागेत ४०% व त्याहून अधिक अपंगत्व असलेल्या परीक्षार्थ्यांच्या बाबतीत तांबड्या शाईने **"अपंग"** असा उल्लेख करावा व आवेदनपत्रासोबत उमेदवाराचा फोटो असलेले जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्व प्रमाणपत्राची छायांकित प्रत प्रमाणित करुन जोडावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२, दि.१८ मार्च २०१४ नुसार-

१. अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्याची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी.

२. परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

३. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनीटे वेळ देण्यात यावा.

४. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणी पत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

१२) **परीक्षा शुल्क :** जून - २०१६ साठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

**सदर शुल्काचा तपशील विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावावा.**

परीक्षा शुल्क हे परिषदेच्या **Account No. 31178450638** वर विहीत केलेल्या चलनानेच **भारतीय स्टेट बँकेत** भरुन मुळ चलनाच्या दोन प्रती आवेदनपत्रासोबत सादर कराव्यात.

| तपशिल | | शुल्क दर रुपये | परीक्षा शुल्क फक्त चलनानेच भरावे. |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा | प्रति विषय रु.५०/- प्रमाणे | |
| २) | वार्षिक पाठ | प्रति पाठ रु. ६०/- प्रमाणे | |

**ऑनलाईन/विलंब शुल्काने/अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | **विनाविलंब** शुल्क भरुन अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | ०६/०२/२०१६ ते २२/०२/२०१६ |
| २. | **विलंब शुल्कासह** अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | २३/०२/२०१६ ते ०३/०३/२०१६ |
| ३. | **अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे प्रत्यक्ष परिषदेस सादर करण्याचा दिनांक** | ०४/०३/२०१६ ते ३१/०३/२०१६ |

**टीप :- १) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी दि. ०३/०३/२०१६ पर्यंतच web-site सुरु राहील. दि. ०४/०३/२०१६ पासून ऑनलाईन आवेदनपत्राच्या दि. ०३/०३/२०१६ पूर्वी काढलेल्या कोऱ्या आवेदनपत्राच्या प्रिंटद्वारे अतिविलंब शुल्काचे आवेदनपत्र मॅन्युअली भरण्यात यावेत.**

**२) दि. २२/०२/२०१६ या तारखेनंतर आवेदनपत्र भरल्यास दि. ०३/०३/१६ पर्यत विलंब शुल्क रू. १००/- प्रति विद्यार्थी राहील व त्यानंतर आवेदनपत्र भरल्यास विलंब शुल्क रू. १००/- व अतिविंलब शुल्क रू.५०/- प्रतिदिन प्रतिविद्यार्थी याप्रमाणे राहील.**

**३) अतिविलंब शुल्काद्वारे (मॅन्युअल) भरलेली आवेदनपत्रे स्वतंत्र सादर करावीत. ती ऑनलाईन आवेदनपत्राच्या गठ्ठ्यात देऊ नयेत.**

**४) कोणत्याही परिस्थितीत दि. ३१/०३/२०१६ नंतर आवेदनपत्र भरता येणार नाहीत.**

१३) **गुणपडताळणी :-** प्रत्येक विषयास रू. १००/- शुल्क आहे. तसेच गुणपडताळणीचा अर्ज या कार्यालयास परीक्षेच्या निकालानंतर १५ दिवसांच्या आत या कार्यालयास पोहोचणे आवश्यक आहे. त्यानंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची स्पष्ट कल्पना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

१४) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९/०८/२०११ च्या निर्णयानुसार परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या साक्षांकित छायांप्रति संबंधितांना परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत अर्ज करुन मागणी करता येईल. प्रत्येक उत्तरपत्रिकेस रू. ४००/- (अक्षरी रूपये चारशे फक्त) शुल्क आकारून उत्तपत्रिकेची झेरॉक्सप्रत मिळेल. उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती मिळणेबाबतच्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना सोबत दिलेला आहे.

## महत्त्वाचे :-

**परीक्षा परिषदेस आवेदनपत्रे सादर करतेवेळी एन.सी.टी.ई.च्या प्रवेश क्षमतेचे पत्र (Intake Capacity) सादर करावे लागेल. एन.सी.टी.ई.च्या मान्य प्रवेश क्षमतेएवढीच आवेदनपत्रे स्विकारली जातील. NCTE च्या मान्य क्षमतेपेक्षा जादा आवेदनपत्रे भरल्यास ती रद्द समजण्यात येतील तसेच या विद्यार्थ्यांच्या नुकसानीस प्राचार्य अथवा संस्था जबाबदार राहील. संबंधित प्राचार्यांवर कारवाई प्रस्तावित केली जाईल.**

१) प्राचार्यानी **"विनाविलंब"** आवेदनपत्राचे चलन तसेच विलंब शुल्काचे चलन उपरोक्त तक्त्यातील नमूद दिनांकास न भरल्यास त्यांना विलंब/अतिविलंब शुल्क (प्रत्यक्ष चलन भरल्याच्या दिनांकानुसार) भरावे लागेल

२) प्राचार्यानी **"विलंब शुल्कांचे"** चलन उपरोक्त तक्त्यातील नमुद दिनांकास न भरल्यास दि. ०३ एप्रिल २००६ च्या शासन निर्णयानुसार जबाबदार व्यक्तीस **विलंब शुल्क प्रतिविद्यार्थी रू.१००/- व अतिविलंब शुल्क रू.५०/- प्रतिदिन प्रतिविद्यार्थी याप्रमाणे राहील.**

३) आवेदनपत्रे परीक्षा परिषदेत जमा करतांना विहीत अटींची पूर्तता होत नसलेली आवेदनपत्रे/फॉर्मस अपात्र ठरल्याने परीक्षा परिषदेकडून प्राचार्यांना परत केले जातील. अशा अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची फी वजा जाता उर्वरित रकमेचे (उर्वरित पात्र उमेदवारांच्या परीक्षा शुल्काच्या रकमेचा) उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या विहीत दिनांकास भरलेले चलन परीक्षा परिषदेकडे त्याच दिवशी सादर करावे लागेल. अन्यथा दि.०३ एप्रिल २००६ च्या शासन निर्णयानुसार अतिविलंब शुल्क भरावे लागेल.

४) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

## जिल्हानिहाय आवेदनपत्रे (Hard Copy) परिषदेकडे सादर करण्याचा दिनांक

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | नाशिक, जालना, गडचिरोली | १०/०३/२०१६ |
| २ | भंडारा, अमरावती, धुळे | ११/०३/२०१६ |
| ३ | चंद्रपूर, बुलढाणा, पुणे | १४/०३/२०१६ |
| ४ | वर्धा, यवतमाळ, जळगाव | १५/०३/२०१६ |
| ५ | ठाणे,पालघर, नागपूर, सोलापूर | १६/०३/२०१६ |
| ६ | सांगली, सिंधुदुर्ग, हिंगोली, मुंबई | १७/०३/२०१६ |
| ७ | कोल्हापूर ,रत्नागिरी, अकोला | १८/०३/२०१६ |
| ८ | औरंगाबाद, रायगड,नंदुरबार | १९/०३/२०१६ |
| ९ | परभणी, सातारा, लातूर | २१/०३/२०१६ |
| १० | गोंदिया, वाशिम, उस्मानाबाद | २२/०३/२०१६ |
| ११ | बीड, अहमदनगर, नांदेड | २३/०३/२०१६ |

## महत्त्वाच्या सूचना

१) पोष्टाने पाठविलेली आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, ती रद्द समजण्यात येतील व त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. त्याचप्रमाणे सर्व आवेदनपत्रे (Hard Copy) सादर करण्याचा जो दिवस ठरवून दिलेला आहे त्याच दिवशी आवेदनपत्रे सादर करणे आवश्यक आहे. निर्धारित वेळेत आवेदनपत्रे परिषदेस सादर न केल्यास व विद्यार्थ्यांना विलंब शुल्क भरावे लागल्यास, परीक्षेपासून परीक्षार्थी वंचित राहील्यास त्याला संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील.

२) परीक्षा समिती सभा दि. १०/०४/२०१५ मधील विषय क्र. ११२ अन्वये पारीत झालेल्या ठरावानुसार आवेदनपत्र जमा करण्यासाठी ठरवून दिलेल्या दिनांकानंतर-

A) आवेदनपत्र १ महिन्याच्या कालावधीत सादर केल्यास रु. ५,०००/-

B) आवेदनपत्र १ ते २ महिन्यांच्या कालावधीत सादर केल्यास रु. १०,०००/-

C) आवेदनपत्र २ महिन्यानंतर ते अतिविलंब शुल्काची आवेदनपत्र जमा करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत जमा केल्यास रु. १५,०००/-

यापमाणे संस्था/अध्यापक विद्यालय प्राचार्य यांना दंड शुल्क भरावे लागेल व असे दंड शुल्क भरल्याशिवाय संबंधित अध्यापक विद्यालयाचा निकाल जाहिर केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा : **जून - २०१६**

अध्यापक विद्यालयांनी आवेदनपत्रे कार्यालयात सादर करणे ते

विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वाटप करणेबाबत कामाचे

# संभाव्य वेळापत्रक

| अ. क्र | कामाचा तपशिल | संभाव्य दिनांक/कालावधी |
|---|---|---|
| १ | डी. टी. एड्. परीक्षा जून-२०१६ ची अधिसूचना पुस्तिका Online प्रसिद्ध करणे. | ०४ फेब्रुवारी २०१६ |
| २ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | ६ फेब्रु. ते २२ फेब्रु २०१६ |
| ३ | विलंब शुल्क भरुन ऑनलाईन  आवेदनपत्र भरणे. | २३ फेब्रु. ते ०३ मार्च २०१६ |
| ४ | अतिविलंब शुल्क भरुन ऑफलाईन (मॅन्युअल) आवेदनपत्र भरणे. | ०४ मार्च. ते ३१ मार्च२०१६ |
| ५ | अध्यापक विद्यालयांनी एकत्रित आवेदनपत्रे (Hard Copy) प्राचार्य, DIET यांचेकडून तपासून प्रमाणित करून घेणे. | ०४ मार्च ते ०९ मार्च२०१६ |
| ६ | प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांनी ऑनलाईन आवेदनपत्र, मॅन्युअली भरलेली अभ्यासक्रम १९९३ ची आवेदनपत्रे (Hard Copy) आवेदनपत्र भरतानाझालेल्या चुकांबाबतचे त्रुटी पत्रांसह  परिषदेत सादर करणे. | १० मार्च ते २३ मार्च २०१६ |
| ७ | प्राचार्य अध्यापक विद्यालय यांनी विलंब व अतिविलंब शुल्काने भरलेली आवेदनपत्रे परिषदेत सादर करण्याचा अंतिम दिनांक. | दि. ०४ एप्रिल २०१६ |
| ८ | डी. टी. एड्. परीक्षा जून २०१६ केंद्र निश्चिती सहविचार सभा घेणे | १६ मार्च २०१६ |
| ९ | प्राचार्य Diet यांना डी. टी. एड. ५० वितरित करणे. | ०५ एप्रिल २०१६ |
| १० | परिषदेकडून प्राप्त डी. टी. एड्. ५० प्राचार्य,  DIET यांनी संबंधित सर्व अध्यापक विद्यालयास वाटप करणे. | ०७ एप्रिल २०१६ |
| ११ | अध्यापक विद्यालयांनी डी. टी. एड्. ५० मध्ये विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक गुणदान व इतर माहिती अचूक भरुन प्राचार्य, DIET यांचेकडे सादर करणे. | १३ एप्रिल २०१६ |
| १२ | प्राचार्य, DIET यांनी पूर्ण व अचूक माहिती भरलेली  डी. टी. एड्. ५० तपासून व प्रमाणित करून परिषदेत सादर करणे व केंद्र निश्चिती माहिती अंतिम करुन देणे. | २०एप्रिल २०१६ |
| १३ | प्राचार्य, DIET/ प्रतिनिधी यांनी परिषदेतून प्रवेशपत्र घेऊन जाणे. | १२ मे २०१६ |
| १४ | प्राचार्य, DIET यांनी संबंधित अध्यापक विद्यालयास प्रवेशपत्रे वाटप करणे. | १६ मे २०१६ |
| १५ | प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांनी विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वाटप करणे. | १८ मे ते ३१ मे २०१६ |
| १६ | प्रत्यक्ष डी. टी. एड्. परीक्षा जून २०१६ कालावधी | ०२ जून ते ११ जून २०१६ |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा : **जून - २०१६**

## प्रथम वर्ष

# वेळापत्रक

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 02/06/2016 | गुरूवार | 11.00 ते 01.00 | शैक्षणिक मूल्यमापन (83)<br>Educational Evaluation (83) | 40 |
| 03/06/2016 | शूक्रवार | 11.00 ते 02.00 | भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण (81)<br>Indian Society and Primary Education (81) | 80 |
| 04/06/2016 | शनिवार | 11.00 ते 01.00 | शैक्षणिक व्यवस्थापन (84)<br>Educational Management (84) | 40 |
| 05/06/2016 | रविवार | | **सुट्टी** | |
| 06/06/2016 | सोमवार | 11.00 ते 02.00 | अध्ययन - अध्यापनाचे मानसशास्त्र (82)<br>Psychology of Teaching & Learning (82) | 80 |
| 07/06/2016 | मंगळवार | 11.00 ते 01.00 | कार्यशिक्षण (86)<br>Work Education (86) | 40 |
| 08/06/2016 | बुधवार | 11.00 ते 02.00 | गणित (85)<br>Mathematics (85) | 80 |
| 09/06/2016 | गुरूवार | 11.00 ते 02.00 | प्रथम भाषा (विषयज्ञान व अध्यापन पध्दती)<br>First Language (Content & Method)<br>(001,002,003,004,005,008) | 80 |
| 10/06/2016 | शुक्रवार | 11.00 ते 01.00 | शारीरिक शिक्षण (87)<br>Physical Education (87) | 40 |
| 11/06/2016 | शनिवार | 11.00 ते 02.00 | द्वितीय भाषा (विषयज्ञान व अध्यापन पध्दती)<br>हिंदी व हिंदी मराठी संयुक्त (117/517) (217/417/817)<br>Second Language (Content & Method)<br>Hindi & Hindi Marathi Composite | 80 |
| 11/06/2016 | शनिवार | 03.00 ते 06.00 | द्वितीय भाषा - मराठी<br>(विषयज्ञान व अध्यापन पध्दती) (317)<br>हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी<br>Second Language – Marathi (Content & Method)<br>For Hindi medium Candidates | 80 |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा : **जून - २०१६**

# द्वितीय वर्ष

# वेळापत्रक

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 02/06/2016 | गुरुवार | 3.00 ते 6.00 | प्राथमिक शिक्षण सद्य:स्थिती समस्या व उपाय (९१)<br>Present status of Pri.Edn.Difficulties & remeidies (91) | 80 |
| 03/06/2016 | शुक्रवार | 3.00 ते 5.00 | आरोग्य - शिक्षण (वैयक्तिक, शालेय) (९६)<br>Health Education (Individual & School ) (96) | 40 |
| 04/06/2016 | शनिवार | 3.00 ते 6.00 | तृतीय भाषा इंग्रजी (११८/२१८/३१८/४१८/८१८)<br>Third Language English (118/218/318/418/818) | 80 |
| 05/06/2016 | रविवार | सुट्टी | | |
| 06/06/2016 | सोमवार | 3.00 ते 5.00 | कृति संशोधन व नवोपक्रम (९३)<br>Action Research & Innovations (93) | 40 |
| 07/06/2016 | मंगळवार | 3.00 ते 5.00 | माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान (९२)<br>Information, communication & Technology (92) | 40 |
| 08/06/2016 | बुधवार | 3.00 ते 6.00 | विज्ञान व तंत्रज्ञान (९४)<br>Science & Technology | 80 |
| 09/06/2016 | गुरुवार | 3.00 ते 5.30 | इतिहास, नागरिकशास्त्र प्रशासन (९५-अे)<br>History, Civics and administration (95-A) | 60 |
| 10/06/2016 | शुक्रवार | 3.00 ते 5.30 | परिसर अभ्यास, भूगोल (९५-बी )<br>Envionmental Study& Geography (95-B) | 60 |
| 11/06/2016 | शनिवार | 3.00 ते 6.00 | तृतीय भाषा मराठी (३१७/५१८) (इंग्रजी माध्यमासाठी)<br>Third Language Marathi (317/518) (For English Medium) | 80 |

# प्रपत्र - ह

## अध्यापक विद्यालये - मंजुर तुकड्या व मंजुर विद्यार्थी संख्येबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, ------------------------------------------------------------------------------------

या संस्थेच्या ------------------------------------------------------------------------------------

या अध्यापक विद्यालयात शासनाचे निर्णय क्रमांक ------------------------------------------------------------

दिनांक ------------------------ अन्वये २०१५-१६ सालासाठी अनुदान / विना अनुदान या तत्त्वावर अध्यापक विद्यालय चालविण्यास मान्यता दिली आहे. त्यातील तुकड्या व विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे आहे.

| मंजुर तुकड्या | | मंजुर विद्यार्थी संख्या | | माध्यम |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | |
| | | | | |

वरील सर्व विद्यार्थ्यांनी विहीत केलेल्या प्रवेशाच्या सर्व अटींची पूर्तता केली असून सर्व उमेदवारांना या कार्यालयाने दिलेल्या अधिकृत यादीतून प्रवेश दिलेला आहे. **व्यवस्थापन / स्पॉट कोट्यातील प्रवेशास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतली आहे.** या अध्यापक विद्यालयात शासनमान्य अभ्यासक्रमानुसार अध्यापनाचे कार्य, प्रात्यक्षिक काम इ.बाबी पूर्ण केल्या आहेत. या अध्यापक विद्यालयाची तपासणी करण्यात आली असून सदरील अध्यापक विद्यालयास सक्षम अधिकाऱ्यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. विद्यार्थ्यांची एकूण संख्या एन.सी.टी.ई.ने मान्य केलेल्या संख्येपेक्षा अधिक नाही, याची खात्री करण्यात आली आहे. डी. टी. एड. परीक्षेस बसण्यासाठी विहीत केलेल्या सर्व प्रकारच्या अटीची पूर्तता होत असल्याने सोबत जोडलेल्या मी स्वाक्षरी केलेल्या प्रथम/द्वितीय वर्ष उमेदवारांच्या यादीतील सर्व उमेदवारांना जून-२०१६ मध्ये होणाऱ्या अध्यापक शिक्षण पदविका परीक्षेस बसण्याची परवानगी देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

सन २०१५-१६ साठी मान्यता असलेल्या अध्यापक विद्यालयाची यादी मा. संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी वेब-साईटवर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिद्ध केलेली आहे. त्या यादीतील अध्यापक विद्यालयाचे नाव असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत किंवा प्रिंट सोबत जोडली आहे.

स्वाक्षरी
**प्राचार्य,**
संबधित अध्यापक विद्यालय

स्वाक्षरी
**प्राचार्य,**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर)

(प्राचार्य : जि.शि.व प्र.संस्था/शिक्षण निरीक्षक, (उत्तर) यांनी सांक्षाकित उमेदवारांची यादी सोबत जोडावी.)

**प्रपत्र - य**

# परीक्षार्थीची यादी

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा जून - २०१६

विशेष सूचना : प्रत्येक माध्यमासाठी स्वतंत्र यादी इयर कोड १,२,३,४,५,६ नुसार काढावी.

| अ. क्र. | उमेदवाराचे संपूर्ण नाव | प्रवेश दिनांक | प्रात्यक्षिक काम विहीत अभ्यासक्रमानुसार पूर्ण केले आहे काय? | आवश्यक उपस्थिती पूर्ण केली आहे काय? किंवा क्षमापित करून घेतली आहे काय? | जून-२०१६ परीक्षेस घेतलेले विषय | | परीक्षा शुल्क भरलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| | | | | | | | |

एकूण रक्कम रुपये ___________________ अक्षरी ---------------------------------------------------------------------------

प्राचार्यांची सही व शिक्का

वरील सर्व माहिती तपासून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे. अध्यापक विद्यालयाने प्रात्यक्षिक काम व वार्षिक काम व बाबीची पूर्तता अभ्यासक्रमानुसार केली आहे. मान्य माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमांचा तसेच मान्यता नसलेल्या व्यवस्थापन कोट्यातील मुलांचा समावेश यात नाही याची खात्री केली आहे.

सही व शिक्का
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
-------------------------------------------------
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर)

# प्रपत्र - ब

## परीक्षा शुल्क भरणा माहिती

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा जून-२०१६

अध्यापक विद्यालयाचे नाव : ---------------------------------------- कोड क्रमांक : ------------------------

| प्रथम वर्ष | | | | द्वितीय वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व विषय घेऊन बसलेले विद्यार्थी संख्या | पुनर्प्रवेशु | एकूण | परीक्षा फी जमा | सर्व विषय घेऊन बसलेले विद्यार्थी संख्या | पुनर्प्रवेशु | एकूण | परीक्षा फी जमा | एकूण फी जमा (४ ते ८) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

विषय कोड क्रमांक : ८१,८२,८३,८४,८५,८६,८७ प्रथम भाषा, द्वितीय भाषा, आणि ९१,९२,९३,९४,९५,९६ तृतीय भाषा (२००४ अभ्यासक्रम)

# प्रपत्र - न

## परीक्षार्थ्यांचे माध्यम व विषय निहाय माहिती प्रपत्र-न

D.T.Ed. Examination

**JUNE -2016**

**Indent -1**

Institute code: ________________

Centre Code : ________________

1) Name of the D.T.Ed.College ---------------------------------------------
2) Name of the Management ------------------------------------------------
3) No. of students (year code wise) -----------------------------------------

| Medium Code No. | Year code wise | | | | | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 1+2 | 3 | 4 | 5 | 6 | 3 to6 | (1to 6) |
| MAR (001) | | | | | | | | | |
| URDU(002) | | | | | | | | | |
| HINDI (003) | | | | | | | | | |
| GUJRATI (004) | | | | | | | | | |
| ENGLISH (005) | | | | | | | | | |
| KANNAD (008) | | | | | | | | | |

## NO OF STUDENT MEDIUM WISE

| Subject Code No. | Marathi | Urdu | Hindi | Gujarati | English | Kannad |
|---|---|---|---|---|---|---|
| 81 | | | | | | |
| 82 | | | | | | |
| 83 | | | | | | |
| 84 | | | | | | |
| 85 | | | | | | |
| 86 | | | | | | |
| 87 | | | | | | |
| I$^{st}$ Lang. | | | | | | |
| II$^{nd}$ Lang. | | | | | | |
| 91 | | | | | | |
| 92 | | | | | | |
| 93 | | | | | | |
| 94 | | | | | | |
| 95A | | | | | | |
| 95B | | | | | | |
| 96 | | | | | | |
| III$^{rd}$ Lang. | | | | | | |

# आवेदनपत्राच्या गठ्ठयावर लावावयाचे मुखपृष्ठ (Control Sheet)
## इयर कोडनिहाय

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -४११ ००१ आवेदन पत्र संख्या
अध्यापक शिक्षण पदविका मे / जून - २०१६

अध्यापक विद्यालय सांकेतांक

इयर कोड

जिल्हा ------------------------------------------------ जिल्हा सांकेतांक

परीक्षा केंद्राचे ठिकाण ------------------- परीक्षा केंद्र सांकेतांक

परीक्षा केंद्राचे नाव : ------------------------------------------------------------------------------------------

माध्यमनिहाय परीक्षार्थी

| मराठी | उर्दू | हिंदी | गुजराथी | इंग्रजी | कन्नड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ८ | |
| | | | | | | |

लिपीक
सही : -------------------------
नाव : -------------------------

प्राचार्य
सही : -------------------------
नाव : -------------------------

अध्यापक विद्यालयाचा शिक्का : ------------------------

---

संगणक संस्था
सही : -------------------------
नाव : -------------------------

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
सही : -------------------------
नाव : -------------------------

# प्रपत्र अ

## डी.टी.एड्. परीक्षा जून - २०१६
## जमा शुल्काचा तपशील

जिल्हा :- ------------------------------------------------------------ अध्या.विद्या. क्रमांक [ ]

| तपशील | विषय संख्या | विद्यार्थी संख्या | परीक्षा शुल्क रू. ५० प्रमाणे | रक्कम | वार्षिक पाठ फी | एकूण परीक्षा शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| प्रथम वर्ष | ९ | | | | | |
| | ८ | | | | | |
| | ७ | | | | | |
| | ६ | | | | | |
| | ५ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | २ | | | | | |
| | १ | | | | | |
| एकूण | | | | | | |
| द्वितीय वर्ष | ८ | | | | | |
| | ७ | | | | | |
| | ६ | | | | | |
| | ५ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | २ | | | | | |
| | १ | | | | | |
| एकूण | | | | | | |
| | | | | | | |
| **अ.क्र.** | **चलन क्रमांक** | | **दिनांक** | | **भरणा रक्कम** | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| एकूण | | | | | | |

प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का

# प्रपत्र ब

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा जून-२०१६

Online भरलेल्या आवेदनपत्रामधील त्रुटींची सविस्तर माहिती

**अध्यापक विद्यालयाचे नाव :-** ---------------------------------------------- **अध्या. विद्या. क्रमांक** ____________

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम / द्वितीय वर्ष | त्रुटीचा तपशील | त्रुटीची पुर्तता करणेबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

प्राचार्य,

अध्यापक विद्यालय, स्वाक्षरी व शिक्का

# पडताळा सूची

अध्यापक विद्यालय कोड क्रमांक **2004 अभ्यासक्रम**

आवेदनपत्र संख्या

डी.टी.एड.परीक्षा जून-२०१६ परीक्षा फॉर्मसोबत जोडावयाची कागदपत्रे -

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रपत्र “ह” | - | सन २०१५-२०१६ ची शासन मान्यता तुकडया प्रवेश क्षमता |
| २) | प्रपत्र “य” | - | परीक्षार्थीची यादी माध्यमनिहाय / इअरकोड वाईज |
| ३) | प्रपत्र “व” | - | परीक्षार्थी वर्गीकरण, परीक्षा शुल्क माहिती |
| ४) | प्रपत्र “न” | - | इंडेंट (१) |
| ५) | परीक्षा शुल्क | - १) | नियमित प्रति विषय रु.५० प्रमाणे |
| | | - २) | नियमीत पुनप्रवेशू (रिपीटर) रु.५०/- प्रति विषय |
| | | - ३) | विलंब शुल्क रुपये १००/- प्रति विद्यार्थी |
| | | - ४) | अति विलंब शुल्क प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु ५०/- (दि.३/४/०६ च्या शासन निर्णयानुसार) |

६) परीक्षार्थी यादीवर प्राचार्य DIET/शि.नि बृहन्मुंबई(उत्तर) यांची प्रतिस्वाक्षरी घेतलेली आहे.

७) पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेतंर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या “आवेदनपत्रावर उपसंचालक पत्रद्वारा प्रशिक्षण योजना यांची प्रतिस्वाक्षरी” घेतलेली आहे.

८) प्रत्येक आवेदनपत्रासोबत यापूर्वीच्या सर्व परीक्षांच्या गुणपत्रकाची प्रत जोडणे आवश्यक.

९) प्रत्यक्ष परीक्षा फॉर्म - नाव, इयरकोड, माध्यम, पूर्वसंपादणूक गुण, A ज्या विषयास ५०% व ५०% पेक्षा जास्त गुण असतील तर त्या विषयासमोर “N” आणि ५०% पेक्षा कमी गुण असतील तर “Y” नोंदवावे.

१०) प्रत्येक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्यामध्ये ५०% टक्के पेक्षा कमी गुण असलेल्या विषयासाठी Y आणि ५०% व ५०% पेक्षा जास्त गुण असल्यास N नमुद करावे.

११) कॉपी केस - प्रतिबंधित कालावधी संपला काय? उमेदवार पात्र ठरतो काय? प्रतिबंधक आदेशाची प्रत.

१२) अधिसूचनेंतील पडताळासूची व आवेदनपत्र व्यवस्थितपणे भरुन Control sheeet स्वाक्षरी केली आहे काय ?

१३) सन २०१५-१६ मध्ये अध्यापक विद्यालयांसाठी प्रवेश मान्यता मिळालेले आदेश व प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी.

१४) व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशास सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याची खात्री केली काय?

१५) एन.सी.टी.ई.ने मान्य केलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी नाहीत याची खात्री केली?

प्राचार्य सही

पूर्ण नाव :- ------------------------------------

अध्यापक विद्यालय शिक्का व स्वाक्षरी

जा.क्र.मरापप/डीटीएड्/मूल्य/
गुणपडताळणी अर्ज नोव्हें-१५
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :-

प्रति,

प्राचार्य,
१. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
२. सर्व मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य,
(महाराष्ट्र राज्य)

**विषय** :- डी.टी.एड्.परीक्षा नोव्हेंबर - २०१५
गुणपडताळणी अर्जात अचूक माहिती देणेबाबत..

मे-२००७ च्या परीक्षेपासून उत्तरपत्रिकेवर बारकोड/होलोक्राफ्ट पध्दतीचा वापर केला जातो, हे आपणास विहीत आहेच बारकोड पध्दतीमुळे गुणपडताळणीच्या अर्जामध्ये परीक्षार्थीनी गुणपडताळणी विषयाचा कोड क्रमांक, माध्यम व बैठक क्रमांक या बाबतची माहिती अचूक देणे आवश्यक आहे. यापैकी काहीही माहिती चुकीची असल्यास किंवा माहिती अपूर्ण दिल्यास **"बारकोड व होलोक्राफ्ट** " या संगणकीय पध्दतीमुळे योग्यती उत्तरपत्रिका उपलब्ध होवू शकणार नाही व पर्यायाने गुणपडताळणीबाबतची कार्यवाही होणार नाही त्यामुळे संबंधिताच्या अर्जाबाबत निर्णय घेता येणार नाही.

डी.टी.एड्. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर परीक्षार्थी काही विषयाकरिता गुणपडताळणीसाठी "गुणपडताळणी अर्ज" अध्यापक विद्यालयामार्फत विहीत नमुन्यामध्ये सादर करतात. परिषदेमध्ये संबंधित गुणपडताळणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर **"अर्जाची छाननी"** केली जाते. या गुणपडताळणी अर्जामध्ये खालील त्रुटी निदर्शनास येतात.

१) अर्जामध्ये बैठक क्रमांक चुकीचा लिहिणे.
२) गुणपडताळणी करावयाच्या विषयाचे नाव एक व संबंधित विषयाचा संकेतांक क्रमांक वेगळाच म्हणजे चुकीचा लिहिणे. उदा :- "शैक्षणिक मूल्यमापन" या विषयाचा कोड क्रमांक (८४) लिहिणे म्हणजे चुकीचा लिहिणे वास्तविक "शैक्षणिक मूल्यमापन" विषयाचा कोड क्रमांक (८३) असा बरोबर लिहावा.
३) **प्रथम भाषा / द्वितीय भाषा** :- विशेषत: हया विषयासाठी गुणपडताळणीसाठी अर्ज केला जातो. परंतु अर्जामध्ये प्रथम भाषा, द्वितीय भाषा असे नमूद केले जाते. संबंधित विषयाचे नाव व विषय संकेतांक क्रमांक लिहिला जात नाही. बारकोड पध्दतीमध्ये प्रथम भाषा / द्वितीय भाषा या विषयासाठी अर्ज करताना प्रथम भाषा कोणती व संबंधित प्रथम भाषेचा विषय कोड क्रमांक ००१, ००२,००३,००४,००५,००८ यापैकी जी प्रथम भाषा असेल त्या विषयाचा विषय कोड क्रमांक लिहिणे आवश्यक आहे. **याचप्रमाणे द्वितीय भाषा कोणती या बाबतही स्पष्ट विषयाचे नाव व विषय संकेतांक लिहिणे आवश्यक आहे.** अपूर्ण माहिती असल्यास संबंधित विषयाची गुणपडताळणी केली जाणार नाही या बाबतीत प्राचार्यांनी परिषदेकडे प्रस्ताव पाठविताना खात्री करावी. अपूर्ण माहिती असल्याने गुणपडताळणी अर्ज रद्द केला जाईल व यास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.
४) **खालील त्रुटींमुळे अर्ज रद्द करण्यात येईल** :-
i) विहीत नमुन्यातील अर्ज नसल्यास किंवा अपूर्ण माहिती भरलेली असल्यास
ii) विषयानुसार शुल्क नसल्यास

iii) विषयानुसार विषय कोड क्रमांक नसल्यास, गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत नसल्यास अथवा चुकीच्या गुणपत्रिकेची प्रत जोडल्यास.

iv) विषयानुसार विषयाचे नाव, विषयाचे सांकेतांक क्रमांक व माध्यम नसल्यास.

v) निर्धारित शुल्क नसल्यास

५) काही अध्यापक विद्यालये परीक्षार्थीनी सादर केलेले गुणपडताळणीचे अर्ज व शुल्क (डी.डी) अंतिम मुदतीपर्यंत स्वत: जवळच ठेवतात व असे एकत्रित साठवून ठेवलेले सर्व अर्ज अंतिम मुदतीच्या दिनांकास किंवा नंतर पोस्टाद्वारे परिषदेकडे पाठविले जातात. वास्तविक गुणपडताळणीचा अर्ज अंतिम मुदतीपर्यंत परिषदेकडे जमा होणे अपेक्षित आहे. त्यामुळे अंतिम मुदतीच्या दिनांकास पोष्ट केलेले अर्ज परिषदेकडे अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे मुदतीत उपलब्ध होत नसल्याने संबंधित अर्ज मुदतबाहय या कारणाने रद्द केले जातात. तेव्हा जसजसे अर्ज प्राप्त होतील. तसतसे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी. अन्यथा अर्ज परीक्षार्थीनी वेळेत देवूनही आपण उशीरा पाठविल्यामुळे मुदतबाह्य म्हणून रद्द केला जाईल, यास आपण जबाबदार राहाल याची दक्षता घ्यावी.

६) गुणपडताळणी शुल्क प्रत्येक विषयासाठी - रु.१००/- उत्तरपत्रिकांची साक्षांकित छायाप्रत मिळविण्यासाठी प्रत्येक विषयासाठी - रु.४००/- या प्रमाणे विहीत चलनाद्वारे "महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे" यांच्या खात्यावर भरण्यात यावे व सोबत चलनाच्या दोन प्रती जोडाव्यात.

७ ) फक्त गुणपडताळणी करायची असेल तर गुणपडताळणी अर्जाच्या नमुन्यामध्येच फॉर्म भरावा.

**८) एकाच विषयाची गुणपडताळणी व साक्षांकित छायाप्रत करण्यासाठी दोन स्वतंत्र अर्ज करु नये. साक्षांकित छायाप्रत मागणी करायची असेल तर त्या विषयाची गुणपडताळणी करुनच साक्षांकित छायाप्रत दिली जाते म्हणून स्वतंत्र साक्षांकित छायाप्रत मागणी अर्जाच्या नमुन्यामध्येच फॉर्म भरावा.**

९) निकाल जाहिर झाल्यानंतर परिक्षार्थ्याने गुणपत्रिकेमध्ये काही त्रुटी म्हणजे नाव / आडनाव विषयामध्ये चुका असल्यास त्याच प्रमाणे विषयामध्ये हजर / गैरहजर प्रात्यक्षिक गुण इ. बाबत काहीही त्रुटी असल्यास परिक्षार्थीनी परिषदेकडे सादर करावयाचे अर्ज प्राचार्यामार्फत निकाल जाहीर झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या नंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. गुणपडताळणी व छायांकित प्रतीसाठीच्या अर्जाची अंतिम मुदत परिक्षेचा निकाल परिषदेच्या संकेत स्थळावर जाहिर झाल्यानंतर १५ दिवसांपर्यंत राहील याची नोंद प्राचार्य आणि परिक्षार्थी यांनी घ्यावी.

वरील मुद्दे विचारात घेवूनच प्राचार्यांनी स्वाक्षरी करावी. उपरोक्त त्रुटींची पूर्तता करुनच संबंधित अध्यापक विद्यालयाने गुणपडताळणीचे अर्ज अंतिम मुदतीच्या आत पाठवावेत. अन्यथा अपूर्ण अर्ज व मुदत बाहय अर्ज म्हणून रद्द करण्यात येईल व त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांवर राहील.

**सही/-**

**आयुक्त,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## गुणपडताळणी अर्जाचा नमुना

**कार्यालयीन कामासाठी**
कोड क्र. [ ]

| |
|---|
| प्रकरणिका क्र. ________________ |
| गुणपडताळणी अर्जाचा अंतिम<br>दिनांक :- २२/०२/२०१६ |

मा.आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

**विषय** :- गुणपडताळणी अर्जाबाबत - डी.टी.एड्.परीक्षा नोव्हेंबर-२०१५

महोदय,

मला वरील परीक्षेत मिळालेल्या गुणांची पडताळणी करुन घ्यावयाची आहे.

१) परीक्षार्थीचे नाव / पूर्ण पत्ता ---------------------------------------------------------

२) आसन क्रमांक ---------------------------------------------------------------------

३) अभ्यासक्रम (२००४) ------------------ ४) वर्ष (प्रथम / द्वितीय) ------------------------

५) परीक्षा केंद्र क्रमांक व केंद्राचे नांव : -------------------------------- ६) माध्यम -----------

७) गुणपडताळणी शुल्क रु १००/- प्रति विषय "**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**" यांचे नावानेच चलनाद्वारे पाठवावे. "**स्टेट बँक ऑफ इंडीया**" पुणे शाखा खाते क्रमांक **३११७८४५०६३८** या खात्यावर रक्कम भरावी व त्याच्या दोन मुळ प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

रक्कम ______________________ चलन क्रमांक _______________________________ तारीख ______________________

८) प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासाठी फक्त एकच अर्ज गुणपडताळणीसाठी करावा व सोबत गुणपत्राची छायाप्रत जोडावी.

९) गुणपडताळणी करावयाचे विषय : १०) गुणपडताळणी विषयांची संख्या

| अ.क्र | विषय संकेतांक क्रमांक | विषयाचे नाव | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

> **टीप :** गुणपडताळणीच्या निर्णयाची वाट न पाहता आगामी परीक्षेसाठी आवेदनपत्र मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

आपला विश्वासू,
**विद्यार्थ्यांची सही**

वरील तपशील अभिलेखावरुन तपासून पाहिला असून तो बिनचूक असल्याची खात्री केली आहे.

**टीपः-** १) प्रथम भाषा / द्वितीय भाषा / तृतीय भाषेसाठी गुणपडताळणी अर्ज करावयाच्या असल्यास विषय कोड क्रमाक बिनचूक लिहिणे आवश्यक आहे.

२) बैठक क्रमांक, विषयाचे नांव व विषय कोड क्रमांक बिनचूक लिहिणे बाबतही खात्री केली आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज रद्द होईल याची दक्षता घेतली आहे.

३) अंतिम दिनांकापर्यंतच अर्ज प्राप्त होणे आवश्यक आहे. अर्ज पोस्टाने पाठविला असल्यास संबंधित टपाल मुदतीच्या आत प्राप्त होणे जरुरीचे आहे. मुदतबाहय अर्ज उशिरा प्राप्त झाल्याने स्विकारला जाणार नाही.

४) अंतर्गत गुणाच्या पडताळणीसाठी परीक्षा परिषदेकडे अर्ज करु नयेत. परिषदेस सादर केलेल्या डी.टी.एड्.५० च्या स्थळप्रती / झेरॉक्स प्रतीवरुन खात्री करुन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

५) गुणपडताळणी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २२/०२/२०१६ आहे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व कोणत्याही परिस्थितीत भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

**प्राचार्य,**

**अध्या.विद्या. चा कोड क्रमांक** **अध्यापक विद्यालय, स्वाक्षरी व शिक्का**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

## उत्तरपत्रिकेची **साक्षांकित** छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी /शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या साक्षांकित छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहीत पध्दतीने अध्यापक विद्यालयामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) ऑन लाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत विद्यार्थ्यांमार्फत परिषदेकडे विहीत नमून्यात अर्ज करावेत तद्नंतरच्या दिनांकांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३) विहीत अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) उत्तरपत्रिका साक्षांकित छायाप्रतीसाठी **प्रतिविषय रु.४००/-** इतके शुल्क आकारण्यात येईल.

५) उत्तरपत्रिका साक्षांकित छायाप्रती मागणी बाबतचा अर्ज व शुल्क (रोख किंवा परिषदेच्या चलनाव्दारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाव्दारे) थेट परिषदेकडे अथवा पोस्टाने स्विकारण्यात येईल. अर्जासोबत विद्यार्थ्याच्या संकेतस्थळावरील गुणांची गुणपत्रिकेची छायाप्रत जोडावी.

६) उत्तरपत्रिका साक्षांकित छायाप्रत मिळविण्यासाठी अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) अर्जदारास साक्षांकित छायाप्रत मिळण्याचा संभाव्य कालावधी त्याला भ्रमणध्वनी व्दारे कळविण्यात येईल.

८) उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रतीची मागणी पोस्टाव्दारे असल्यास पोस्टाचा पूर्ण पत्ता जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची साक्षांकित छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने किंवा हस्तपोच देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) समक्ष साक्षांकित छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र / फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिका साक्षांकित छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११) मा. सर्वोच्च न्यायालयाने परितोष भूपेशकुमार शेठ AIR १९८४/SC१५४३ च्या प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशानुसार तसेच तरतूदीनुसार विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन किंवा उत्तरांची पुन्हा तपासणी करण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यास तसा हक्क असणार नाही.

१२) एकदा उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत दिल्यावर त्याच्याशी संबधित कोणतीही माहिती, माहिती अधिकाराखाली दिली जाणार नाही.

१३) परीक्षक /नियामक इ. ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१४) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत देण्यात येणार नाही.

१५) उत्तरपत्रिकांची साक्षांकित छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१६) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची साक्षांकित छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१७) विहीत मुदतीत उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मागणी करण्याचा विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त न झाल्यास कोणत्याही परिस्थितीत आपण अदा केलेले शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप :- संबधीत सूचना प्रसिध्दीसाठी अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या नजरेस येईल अशा दर्शनी नोटीस बोर्डवर लावावी.**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मिळण्याबाबत अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| प्रकरणिका क्र. | |

डी. टी. एड्. परीक्षा नोव्हेंबर २०१५

प्रति, अर्ज करण्याचा अंतिम दि. २२/०२/२०१६

मा. आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

महोदय,

मी खाली सही करणार विनंती अर्ज करते की /करतो की, नोव्हेंबर २०१५ अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (D.T.Ed) परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालो होतो /झाले होते. सदर परीक्षेच्या खालील विषयांच्या उत्तरपत्रिका /उत्तरपत्रिकांच्या साक्षांकित छायाप्रती मला मिळावी /मिळाव्यात यासाठी मी रु. ४००/- (रुपये चारशे मात्र ) प्रति विषय प्रमाणे शुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशिल खालीलप्रमाणे.

| परीक्षा बैठक क्रमांक | परिक्षार्थीचे पूर्ण नाव | अ. वि. सांकेतांक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

| पिनकोडसह पूर्ण पत्ता :- | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| तालुका :- | जिल्हा :- | पिनकोड नंबर |
| दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्र. | | |

उत्तरपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत मिळणेबाबतचा तपशिल :

(संकेतस्थळावरील गुणपत्रिकेची / प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत (झेरॉक्स) सोबत जोडावी. )

| अ.क्र. | विषय कोड क्रमांक | विषयाचे नाव | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| उ.प. छायांकित प्रत देणेसाठी अर्ज केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी. डी. क्रमांक | पावती क्रमांक | चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | | |

वरील दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या सोबत दिलेल्या अटी / शर्ती व सूचना त्या मला मान्य आहेत. वरील विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या साक्षांकित छायाप्रती हस्तपोच / पोस्टाव्दारे देण्यात याव्यात. वर दिलेली माहिती सत्य आहे.

दिनांक : ठिकाण : विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

उत्तरपत्रिका साक्षांकित छायाप्रतिची मागणी करण्याच्या अर्जाची अंतिम मुदत दि.२२/०२/२०१६ अशी आहे. या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. *ज्या विषयासाठी साक्षांकित छायाप्रत मागणी केली आहे, त्याच विषयाच्या गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नाही.*

टिप :- वरील तपशील तपासून पाहिला असून तो बिनचूक असल्याची खात्री केली आहे.

प्राचार्य,

स्वाक्षरी व अध्या. विद्या. शिक्का

दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी
आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती
लिहीण्यासाठी समक्ष नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे
परीक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२**

मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख : १८ मार्च, २०१४

**वाचा:-**

१) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प-७/लेखनिक/सुविधा/२००६-०७/२९५१, दि.२० डिसेंबर, २००६ परिपत्रक
३) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/डिस्लेक्सिया/२०११-१२/२३६६, दि.२२ जून, २०११ चे शुध्दिपत्रक
४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र.अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दि.२३मे,२०११ चे पत्र
५) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.२९ एप्रिल, २०११ चे आदेश
६) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.५ ऑगस्ट, २०११ चे आदेश
७) शासन परिपत्रक क्रमांक:- न्यायाप्र-२०११/प्र.क्र.९१/सुधार-३, १७ ऑगस्ट, २०११
८) केंद्रिय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश दि.२६ फेब्रुवारी, २०१३

**प्रस्तावना:-** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम क्र.५ व ६ नुसार अपंग व्यक्तींना शालेय, महाविद्यालयीन, पूर्व प्रवेश परिक्षा तसेच स्पर्धा परिक्षेसाठी लेखनिक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि अशा सूचना संबंधित प्राधिकाऱ्यांना वेळोवेळी देऊनही

अपंग व्यक्तींना लेखनिक उपलब्ध करुन देताना समस्या निर्माण होत असल्याचे तसेच काही स्पर्धा परिक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले. मा.उच्च न्यायालयानेही वरील अनु.क्र.६ येथे नमूद केलेल्या याचिका प्रकरणी दि.५ ऑगस्ट, २०११ रोजी अपंग व्यक्तींना सर्व परिक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्याचे निदेश दिले. त्यास अनुसरुन या विभागाच्या दि.१७ ऑगस्ट, २०११ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या.

तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो याचिका क्र.२०१३/७९३८ यामध्ये दिलेल्या अंतरिम निर्णयात लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच केंद्र शासनानेही दि.२६.०२.२०१३ च्या कार्यालयीन आदेशान्वये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत विविध सूचना केलेल्या आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन उपरोक्त दि.१७ ऑगस्ट, २०११ चे परिपत्रक अधिक्रमीत करुन नव्याने सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रकः-** दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेले विद्यार्थी / उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परिक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबीसंदर्भात दिनांक १७ ऑगस्ट, २०११ चे परिपत्रक अधिक्रमिक करुन खालीलप्रमाणे नव्याने सूचना देण्यात येत आहेत. या सूचना स्पर्धात्मक परिक्षा व नियमित स्वरुपाच्या परिक्षा याकरीता समान असतील :-

१) अपंग उमेदवाराला परिक्षेसाठी लेखनिक हा परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

३) उमेदवारांने परिक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

४) परिक्षा घेणाऱ्या यंत्रणेने परिक्षेच्या आवश्यकतेप्रमाणे लेखनिकाची सक्षमता तपासून निवड करावी व त्याप्रमाणे जिल्हा / विभागीय किंवा राज्य पातळीवर त्यांचे पॅनेल तयार करावा.

५) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकतेप्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला,वाणिज्य,विज्ञान,गणित, अभियांत्रिकी,वैद्यकीय इत्यादी विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकाचा त्या पॅनेलमध्ये समावेश करावा. शक्यतो परिक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत. मात्र उमेदवार स्वत: लेखनिक उपलब्ध करुन घेणार असल्यास त्याचे वय, शैक्षणिक अर्हता, परिक्षेतील गुण व अन्य बाबींबाबत कोणतेही निर्बंध असणार नाहीत. काही अपवादात्मक परिस्थितीत परिक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

६) परिक्षेच्या वेळी पर्यवेक्षका आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करुन फसवणूकीचे किंवा तत्सम गैरप्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

७) परीक्षा मंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या लेखनिकाची एक दिवस अगोदर भेट घेण्याची परवानगी संबंधित उमेदवारास देण्यात यावी. तसेच संगणकाव्दारे दयावयाच्या परिक्षेसाठी सदर संगणक व त्याची आज्ञाप्रणाली परिक्षेच्या एक दिवस अगोदर तपासण्याची मुभा उमेदवारास असेल.

८) वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी मुख्यत्वेकरुन भाषाविषयक परिक्षेसाठी वेगवेगळे लेखनिक उमेदवारास वापरता येतील.

९) परिक्षेचे माध्यम (उदा.सर्वसाधारण / ब्रेल लिपी / संगणकाव्दारे / ध्वनीमुद्रण) स्विकारणचा पर्याय उमेदवारास उपलब्ध असावा. ब्रेल लिपीचा वापर करण्यात आल्यास त्याचा अनुवाद इंग्रजी अथवा स्थानिक भाषेत करण्याची यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात यावी. उमेदवाराने अर्जाव्दारे दिलेली माहिती विचारात घेऊन परिक्षा मंडळाने प्रश्नावली व अन्य बाबीं संदर्भात कार्यपध्दती निश्चित करावी. तसेच उमेदवारास संवाद साधणारे कॅल्क्युलेटर (Talking Calculator) (ज्या परिक्षा पध्दतीत कॅल्क्युलेटर वापरण्याची परवानगी देण्यात आलेली आहे अशा बाबतीत) ॲबॅकस, सुसंवाद साधणारी उपकरणे जसे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कम्युनिकेशन चार्ट या बाबी उमेदवारास आवश्यकतेनुसार पुरविण्यात याव्यात.

१०) अ) परिक्षेची बैठक व्यवस्था करताना दोन दृष्टीहीन उमेदवारांमध्ये किमान पुरेसे अंतर राहील याची दक्षता पर्यवेक्षकांनी घ्यावी, जेणेकरुन एक दृष्टीहीन उमेदवार त्याच्या लेखनिकाशी संभाषण करताना दुसऱ्या दृष्टीहीन उमेदवारास वा अन्य लेखनिकास ऐकू जाणार नाही.

ब) परिक्षेच्यावेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परिक्षा सुरु होण्यापूर्वी योग्य अशी स्वतंत्र बैठक व्यवस्था अपंग उमेदवारांसाठी करण्यात यावी. अपंग उमेदवार व लेखनिक (आवश्यकतेनुसार) यांच्या बसण्याची व्यवस्था शक्यतो तळ मजल्यावर करण्यात यावी व त्याबाबतची माहिती अपंग उमेदवारास आगाऊ देण्यात यावी.

११) लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती / तपशील नमूद करण्यात यावी.

१. परिक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ
२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था
३. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलणे आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

१२) लेखनिकाय अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्याने तो परिक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.

१३) उमेदवार व लेखनिक यांना परिक्षेच्या वेळेबद्दल संपूर्ण माहिती देण्यात यावी.

१४) अतिरिक्त वेळ :-

१. लेखी परिक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनीटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.
२. त्याचप्रमाणे परिक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.
३. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनीटे वेळ देण्यात यावा.
४. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणी पत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

१५) प्रश्न पत्रिकेमधील मूळ प्रश्नात दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षित असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.

१६) परिक्षेकरिता प्रश्नावली निश्चित करताना आकृती व आलेख यावर आधारित असलेल्या प्रश्नाऐवजी पर्यायी प्रश्न अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांसाठी प्रश्नपत्रिकेत उपलब्ध करून देण्यात यावेत.

१७) दृष्टीहीन उमेदवारांना उत्तर पत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. ब्रेल लिपीमधील उत्तर पत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी डिजिटल टेक्स्ट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी. ज्या परिक्षा प्रक्रियेत सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे वापरण्याची सवलत देण्यात आलेली असेल तेथे उमेदवारास टेलर फ्रेम, ब्रेल स्लेट, जॉमेट्री किट, मेजरिंग टेप इत्यादी सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे वापरण्याची मुभा राहील.

१८) परिक्षा पध्दतीमध्ये पुस्तकांचा वापर करणे आवश्यक असेल तेथे ब्रेल लिपिमध्ये संबंधित पुस्तके वापरण्याची मुभा अंध उमेदवारास असेल. तसेच संगणकाचा वापर असल्यास त्या आज्ञा प्रणालीवरील माहिती वाचता येऊ शकणाऱ्या उपकरणाची सोय उमेदवारास उपलब्ध करून देण्यात यावी.

१९) अल्पदृष्टी उमेदवारास परिक्षेसाठी आवश्यक असणारी उपकरणे पुरविण्याची तजविज पर्यवेक्षकांनी करावी. मात्र त्यासंदर्भात उमेदवाराने संबंधित परिक्षा मंडळाकडे लेखी विनंती करणे आवश्यक राहील. अथवा उमेदवाराने अशी उपकरणे परीक्षेकरिता वापरण्यासाठी स्वतंत्र उपलब्ध केल्यास ती वापरण्याची त्यास मुभा राहील. तथापि, सदर उपकरणे वापरण्यास मुभा देण्यापूर्वी परीक्षा मंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या उपकरणासारखेच असल्याची खात्री संबंधित पर्यवेक्षक करील.

२. ऑनलाईन (online) परीक्षा पध्दती संदर्भात स्वतंत्ररित्या कार्यवाही करण्यात येऊन आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

३. अपंग विद्यार्थ्यास संबंधित वैद्यकिय प्राधिकारी यांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र राज्यातील संबंधित परिक्षामंडळ, परीक्षा केंद्र व शिक्षणसंस्था यांनी ग्राह्य धरावे.

४. उपरोक्त सूचना ह्या लेखनिकासाठीच मर्यादित नसून आवश्यकतेनुसार वाचक, प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या संदर्भातही लागू राहतील.

५. अपंग विद्यार्थी / उमेदवाराच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे सुविधा पुरविण्याबाबत संबंधित परीक्षा

मंडळ / केंद्रावरील सूचनांच्या अंमलबजावणीत लवचिकता दाखवू शकतील.

६. सदर शासन परिपत्रक संबंधित मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम व सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था यांच्या तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आयुक्त (समाज कल्याण), संचालक (विजा/भज,इमाव व विमाप्र कल्याण), आयुक्त (अपंग कल्याण) यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक व सर्व प्रकारच्या संस्था यांना तातडीने पाठवावे आणि वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०३२११६५३१३९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वाक्षरीत
(रा.द शिंदे)
सचिव, महाराष्ट्र शासन.

**सदरची अधिसूचना परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**
**संकेतस्थळ - www.mscepune.in**

(फक्त कार्यालयीन वापरासाठी)